
5. आकृती 2.9 मध्ये, रेषा AB || रेषा CD आणि रेषा PQ ही छेदिका आहे तर आकृतीत दाखवलेल्या कोनांच्या मापांवरून पुढील कोनांची मापे काढा.

(i) $\angle$ART (ii) $\angle$CTQ

(iii) $\angle$DTQ (iv) $\angle$PRB




आकृती 2.9



**जाणून घेऊया.**

## समांतर रेषांच्या गुणधर्मांचा उपयोग


समांतर रेषा व त्यांची छेदिका यांच्यामुळे होणाऱ्या कोनांच्या गुणधर्मांचा उपयोग करून त्रिकोणाचा एक गुणधर्म सिद्ध करु.

**प्रमेय** : कोणत्याही त्रिकोणाच्या सर्व कोनांच्या मापांची बेरीज 180° असते.

**पक्ष** : $\Delta$ ABC हा कोणताही एक त्रिकोण आहे.

**साध्य** : $\angle ABC + \angle ACB + \angle BAC = 180°$

**रचना** : A बिंदूतून रेख BC ला समांतर रेषा *l* काढा.
त्यावर P व Q बिंदू असेही घ्या की, P-A-Q




आकृती 2.10

**सिद्धता** : रेषा PQ || रेख BC व रेख AB ही छेदिका.


$\therefore$ $\angle ABC = \angle PAB$.......(व्युत्क्रम कोन).....I

रेषा PQ || रेख BC व रेख AC ही छेदिका.

$\therefore$ $\angle ACB = \angle QAC$.......(व्युत्क्रम कोन).....II

विधान I व II यावरून,

$\angle ABC + \angle ACB = \angle PAB + \angle QAC$ . . . III




आकृती 2.11

समीकरण III च्या दोन्ही बाजूंत $\angle$BAC मिळवू.

$\angle ABC + \angle ACB + \angle BAC = \angle PAB + \angle QAC + \angle BAC$

$= \angle PAB + \angle BAC + \angle QAC$

$= \angle PAC + \angle QAC$ ...($\because \angle PAB + \angle BAC = \angle PAC$)


$= 180°$ ...(रेषीय जोडीतील कोन)

म्हणजेच त्रिकोणाच्या तीनही कोनांच्या मापांची बेरीज 180° असते.



**चला, चर्चा करूया.**

शेजारील प्रतलात रेषा $l$ व रेषा $m$ या एकमेकींना समांतर आहेत का हे कसे ठरवाल ?




आकृती 2.12



**जाणून घेऊया.**

## रेषांच्या समांतरतेच्या कसोट्या (Tests for parallel lines)

दोन रेषा व त्यांची छेदिका त्यांच्यामुळे होणारे कोन तपासून आपण त्या दोन रेषा समांतर आहेत का ते ठरवू शकतो.


(1) छेदिकेच्या एका बाजूच्या आंतरकोनांची जोडी पूरक कोनांची असेल तर त्या रेषा समांतर असतात.

(2) व्युत्क्रम कोनांची एक जोडी समान असेल तर त्या रेषा समांतर असतात.

(3) संगत कोनांची एक जोडी समान असेल तर त्या रेषा समांतर असतात.

## समांतर रेषांची आंतरकोन कसोटी (Interior angles test)

**प्रमेय** : दोन भिन्न रेषांना एका छेदिकेने छेदले असता छेदिकेच्या एका बाजूच्या आंतरकोनांची बेरीज $180^\circ$ असेल तर त्या रेषा समांतर असतात.




आकृती 2.13

**पक्ष** : रेषा AB व रेषा CD यांची रेषा XY ही छेदिका आहे.

$\angle BPQ + \angle PQD = 180^\circ$


**साध्य** : रेषा AB || रेषाCD

**सिद्धता** : ही कसोटी आपण अप्रत्यक्ष पद्धतीने सिद्ध करणार आहोत.

साध्यातील विधान चूक आहे असे मानू.

$\therefore$ रेषा AB व रेषा CD समांतर नाहीत

हे विधान सत्य मानू.




आकृती 2.14

समजा, रेषा AB व रेषा CD या T बिंदूत छेदतात.

त्यामुळे $\Delta$ PQT तयार झाला.

$\angle TPQ + \angle PQT + \angle PTQ = 180^\circ$ . . . . . . त्रिकोणाच्या कोनांची बेरीज


परंतु $\angle TPQ + \angle PQT = 180^\circ$ दिले आहे. . . . . पक्ष

यामुळे त्रिकोणाच्या दोन कोनांची बेरीजच $180^\circ$ आहे.

पण त्रिकोणाच्या तीन कोनांची बेरीज $180^\circ$ असते.

$\therefore$ $\angle PTQ = 0^\circ$ मिळतो.

**उपप्रमेय I** जर एक रेषा त्याच प्रतलातील दोन रेषांना लंब असेल तर त्या दोन रेषा परस्परांना समांतर असतात.




आकृती 2.17

**पक्ष** : रेषा $n \perp$ रेषा $l$ आणि रेषा $n \perp$ रेषा $m$

**साध्य** : रेषा $l \parallel$ रेषा $m$

**सिद्‌धता** : रेषा $n \perp$ रेषा $l$ व रेषा $n \perp$ रेषा $m$ हे दिले आहे.

$\therefore \ \angle a = \angle c = 90^\circ$

$\angle a$ व $\angle c$ हे रेषा $l$ व रेषा $m$ यांच्या


रेषा $n$ या छेदिकेमुळे झालेले संगतकोन आहेत.

$\therefore$ रेषा $l \parallel$ रेषा $m$ . . . . रेषांच्या समांतरतेची संगतकोन कसोटी


**उपप्रमेय II** जर एका प्रतलातील दोन रेषा त्याच प्रतलातील तिसऱ्या रेषेला समांतर असतील तर त्या रेषा परस्परांना समांतर असतात हे सिद्ध करा.

## सरावसंच 2.2

1. आकृती 2.18 मध्ये $y = 108^\circ$ आणि $x = 71^\circ$ तर रेषा $m$ व रेषा $n$ समांतर होतील का ? कारण लिहा.





आकृती 2.18





आकृती 2.19

2. आकृती 2.19 मध्ये जर $\angle a \cong \angle b$ तर सिद्ध करा रेषा $l \parallel$ रेषा $m$




आकृती 2.20

3. आकृती 2.20 मध्ये जर $\angle a \cong \angle b$ आणि $\angle x \cong \angle y$ तर सिद्ध करा की रेषा $l \parallel$ रेषा $n$





आकृती 2.21

4. आकृती 2.21 मध्ये जर किरण BA $\parallel$ किरण DE, $\angle C = 50^\circ$ आणि $\angle D = 100^\circ$, तर $\angle ABC$ चे माप काढा.


(सूचना : बिंदू C मधून रेषा AB ला समांतर रेषा काढा.)

5. आकृती 3.9 मध्ये दिलेल्या कोनांच्या मापांवरून $x$, $y$, $z$ च्या किमती काढा.




**आकृती 3.9**


6. आकृती 3.10 मध्ये रेषा AB || रेषा DE आहे. दिलेल्या मापांवरून $\angle DRE$ व $\angle ARE$ ची मापे काढा.




**आकृती 3.10**


7. $\Delta$ ABC मध्ये $\angle A$ व $\angle B$ चे दुभाजक बिंदू O मध्ये छेदतात. जर $\angle C = 70°$ तर $\angle AOB$ चे माप काढा.

8. आकृती 3.11 मध्ये रेषा AB || रेषा CD आणि रेषा PQ ही त्यांची छेदिका आहे. किरण PT आणि किरण QT हे अनुक्रमे $\angle BPQ$ व $\angle PQD$ चे दुभाजक आहेत, तर सिद्ध करा की $\angle PTQ = 90°$





**आकृती 3.11**

9. आकृती 3.12 मध्ये दिलेल्या माहितीवरून $\angle a$, $\angle b$ व $\angle c$ यांची मापे काढा.




**आकृती 3.12**

10*. आकृती 3.13 मध्ये रेख DE || रेख GF आहे. किरण EG व किरण FG हे अनुक्रमे $\angle DEF$ व $\angle DFM$ या कोनांचे दुभाजक आहेत. तर सिद्ध करा की,
(i) $\angle DEF = \angle EDF$ (ii) EF = FG





**आकृती 3.13**

**प्रमेय** : काटकोन त्रिकोणात कर्णावर काढलेल्या मध्यगेची लांबी कर्णाच्या निम्मी असते.

**पक्ष** : काटकोन $\Delta$ ABC मध्ये रेख BD ही मध्यगा आहे.

**साध्य** : $BD = \frac{1}{2} AC$

**रचना** : किरण BD वर E बिंदू असा घ्या की B - D - E आणि $l(BD) = l(DE)$. रेख EC काढा.




**आकृती 3.36**

**सिद्धता :** (सिद्धतेतील मुख्य पायऱ्या दाखवल्या आहेत. मधल्या पायऱ्या विधाने व कारणे या रूपात लिहा व सिद्धता पूर्ण करा.)

$\Delta$ ADB $\cong$ $\Delta$ CDE ...... बाकोबा कसोटी

रेषा AB || रेषा EC ..........व्युत्क्रम कोन कसोटी.

$\Delta$ ABC $\cong$ $\Delta$ ECB ...... बाकोबा कसोटी


$BD = \frac{1}{2}(AC)$

**हे लक्षात ठेवूया.**

कोणत्याही काटकोन त्रिकोणात कर्णावर काढलेल्या मध्यगेची लांबी कर्णाच्या निम्मी असते.

## सरावसंच 3.3

1. आकृती 3.37 मध्ये दाखवलेली माहिती पाहा. $x$ आणि $y$ च्या किंमती काढा. तसेच $\angle ABD$ व $\angle ACD$ ची मापे काढा.





**आकृती 3.37**

2. काटकोन त्रिकोणात कर्णाची लांबी 15 असेल तर त्यावर काढलेल्या मध्यगेची लांबी काढा.

3. $\Delta$ PQR मध्ये $\angle Q = 90°$, PQ = 12, QR = 5 आणि QS ही PR ची मध्यगा असेल तर QS काढा.

4. आकृती 3.38 मध्ये $\Delta$ PQR चा G हा मध्यगा संपात बिंदू आहे. जर GT = 2.5 सेमी, तर PG आणि PT यांची लांबी काढा.





**आकृती 3.38**

**भाग II** : कोनाच्या भुजांपासून समान अंतरावर असणारा कोणताही बिंदू त्या कोनाच्या दुभाजकावर असतो.

**पक्ष** : $\angle PQR$ च्या अंतर्भागात A हा एक बिंदू असा आहे की,
रेख $AC \perp$ रेख QR
रेख $AB \perp$ किरण QP
$AB = AC$

**साध्य** : किरण QA हा $\angle PQR$ चा दुभाजक आहे.
म्हणजेच $\angle BQA = \angle CQA$

**सिद्धता** : त्रिकोणाच्या एकरूपतेची योग्य कसोटी वापरून सिद्धता लिहा.




**आकृती 3.43**



**जरा आठवूया.**

**कृती**

आकृतीत दाखवल्याप्रमाणे बाजू XZ > बाजू XY असा
$\Delta$ XYZ काढा.
$\angle Z$ व $\angle Y$ मोजा. कोणता कोन मोठा आहे ?



**आकृती 3.44**



**जाणून घेऊया.**


## त्रिकोणातील बाजू व कोन यांच्या असमानतेचे गुणधर्म

**प्रमेय** : जर त्रिकोणाच्या दोन बाजूंपैकी एक बाजू दुसरीपेक्षा मोठी असेल तर मोठ्या बाजूसमोरील कोन लहान बाजूसमोरील कोनापेक्षा मोठा असतो.

**पक्ष** : $\Delta$ XYZ मध्ये बाजू XZ > बाजू XY

**साध्य** : $\angle XYZ > \angle XZY$

**रचना** : बाजू XZ वर P बिंदू असा घ्या की
$l(XY) = l(XP)$, रेख YP काढा.



**आकृती 3.45**

**सिद्धता** : $\Delta$ XYP मध्ये

XY = XP .........रचना

$\therefore$ $\angle XYP = \angle XPY$.....समान भुजांसमोरील कोनांची मापे समान .....(I)

$\angle XPY$ हा $\Delta$ YPZ चा बाह्यकोन


$\therefore$ $\angle XPY > \angle PZY$ .........बाह्यकोनाचे प्रमेय

$\angle XYP > \angle PZY$ ..........विधान (I) वरून

$\angle XYP + \angle PYZ > \angle PZY$ (जर $a > b$ आणि $c > 0$ तर $a + c > b$)

$\angle XYZ > \angle PZY$ म्हणजेच $\angle XYZ > \angle XZY$

**प्रमेय 1.** समांतरभुज चौकोनाच्या संमुख भुजा एकरूप असतात व संमुख कोन एकरूप असतात.



**आकृती** 5.7

**पक्ष** : □ABCD समांतरभुज चौकोन आहे.
म्हणजेच बाजू AB ।। बाजू DC, बाजू AD ।। बाजू BC.

**साध्य** : रेख AD ≅ रेख BC ; रेख DC ≅ रेख AB
∠ADC ≅ ∠CBA, आणि ∠DAB ≅ ∠BCD.

**रचना** : कर्ण AC काढा.

**सिद्‌धता** : रेख DC ।। रेख AB व कर्ण AC ही छेदिका.

∴ ∠DCA ≅ ∠BAC ...............(1)
आणि ∠DAC ≅ ∠BCA .............(2) } ..... व्युत्क्रम कोन


आता, ΔADC व ΔCBA यांमध्ये,
∠DAC ≅ ∠BCA .......... विधान (2) वरून
∠DCA ≅ ∠BAC .......... विधान (1) वरून
बाजू AC ≅ बाजू CA ........ सामाईक बाजू
∴ ΔADC ≅ ΔCBA ...... कोबाको कसोटी
∴बाजू AD ≅ बाजू CB .... एकरूप त्रिकोणांच्या संगत बाजू
आणि बाजू DC ≅ बाजू AB ........ एकरूप त्रिकोणांच्या संगत बाजू
तसेच, ∠ADC ≅ ∠CBA ......... एकरूप त्रिकोणाचे संगत कोन
याप्रमाणेच ∠DAB ≅ ∠BCD हे सिद्‌ध करता येईल.

**विचार करूया**

वरील प्रमेयात ∠DAB ≅ ∠BCD हे सिद्‌ध करण्यासाठी रचनेत काही बदल करावा लागेल का? तो बदल करून सिद्‌धता कशी लिहिता येईल?

समांतरभुज चौकोनाचा आणखी एक गुणधर्म समजून घेण्यासाठी पुढील कृती करा.

**कृती** : □PQRS हा कोणताही एक समांतरभुज चौकोन काढा. कर्ण PR आणि कर्ण QS काढून त्यांच्या छेदनबिंदूला O हे नाव द्या. प्रत्येक कर्णाच्या झालेल्या दोन भागांच्या लांबीची तुलना कर्कटकाच्या साहाय्याने करा. काय आढळले?




**आकृती** 5.8


**जाणून घेऊया.**

## वर्तुळाच्या एकरूप जीवा व त्यांचे केंद्रापासूनचे अंतर यांसंबंधीचे गुणधर्म


**कृती II**



आकृती (i)



आकृती (ii)



आकृती (iii)

आकृती (i)मध्ये OL = OM, आकृती (ii) मध्ये PN = PT, आकृती (iii) मध्ये MA = MB असे आढळले का ? या कृतीतून लक्षात येणारा गुणधर्म शब्दांत लिहा.

**जाणून घेऊया.**

## एकरूप जीवांचे गुणधर्म (Properties of congruent chords)

**प्रमेय** : एकाच वर्तुळातील एकरूप जीवा वर्तुळकेंद्रापासून समान अंतरावर असतात.


**पक्ष** : O केंद्र असलेल्या वर्तुळात

जीवा AB $\cong$ जीवा CD

OP $\perp$ AB, OQ $\perp$ CD

**साध्य** : OP = OQ

**रचना** : रेख OA व रेख OD जोडा.



**आकृती** 6.10

**सिद्धता** : AP = $\frac{1}{2}$ AB, DQ = $\frac{1}{2}$ CD . . . वर्तुळकेंद्रातून जीवेवर टाकलेला लंब जीवेला दुभागतो.

AB = CD . . . . . . . . . . . . . . . . . पक्ष

$\therefore$ AP = DQ

$\therefore$ रेख AP $\cong$ रेख DQ . . . . . . . . . . (I) . . . समान लांबीचे रेषाखंड

काटकोन $\Delta$ APO आणि काटकोन $\Delta$ DQO मध्ये

रेख AP $\cong$ रेख DQ . . . . . . . . . . . . (I) वरून

कर्ण OA $\cong$ कर्ण OD . . . . . . . . . . . एकाच वर्तुळाच्या त्रिज्या

$\therefore$ $\Delta$ APO $\cong$ $\Delta$ DQO . . . . . . . कर्णभुजा प्रमेय

रेख OP $\cong$ रेख OQ . . . . . . . . . . . . एकरूप त्रिकोणाच्या संगतभुजा

$\therefore$ OP = OQ . . . . . . . . . . . . . . एकरूप रेषाखंडांची लांबी समान

वर्तुळातील एकरूप जीवा वर्तुळकेंद्रापासून समान अंतरावर असतात.

**⁕ अधिक माहितीसाठी**

$$\frac{1}{\sin\theta} = \text{cosec}\,\theta, \quad \frac{1}{\cos\theta} = \sec\theta, \quad \frac{1}{\tan\theta} = \cot\theta$$

म्हणजेच cosec θ, sec θ आणि cot θ ही अनुक्रमे sin θ, cos θ आणि tan θ यांची व्यस्त गुणोत्तरे आहेत.


- $\sec\theta = \text{cosec}\,(90 - \theta)$
- $\text{cosec}\,\theta = \sec\,(90 - \theta)$
- $\tan\theta = \cot\,(90 - \theta)$
- $\cot\theta = \tan\,(90 - \theta)$



**जरा आठवूया.**

**30° – 60° –90° मापाच्या त्रिकोणाचा गुणधर्म**

एखाद्या त्रिकोणाच्या कोनांची मापे 30°,60°, 90° असतील तर आपल्याला माहीत आहे की, 30° कोनासमोरील बाजू कर्णाच्या निम्मी असते आणि 60 ° कोनासमोरील बाजू कर्णाच्या लांबीच्या $\frac{\sqrt{3}}{2}$ पट असते.




आकृती 8.17


शेजारील आकृतीमध्ये, काटकोन Δ ABC मध्ये $\angle C = 30°$, $\angle A = 60°$, $\angle B = 90°$ आहे.

$\therefore AB = \frac{1}{2} AC$ आणि $BC = \frac{\sqrt{3}}{2} AC$



**जाणून घेऊया.**

**30° व 60° या कोनांची त्रिकोणमितीय गुणोत्तरे (Trignometric ratios of 30° and 60°angles)**




आकृती 8.18

काटकोन Δ PQR मध्ये जर $\angle R = 30°$, $\angle P = 60°$, $\angle Q = 90°$ आणि समजा $PQ = a$

तर $PQ = \frac{1}{2}\ PR$

$a = \frac{1}{2}\ PR$

$\therefore PR = 2a$

$QR = \frac{\sqrt{3}}{2} PR$

$QR = \frac{\sqrt{3}}{2} \times 2a$

$QR = \sqrt{3}\,a$

$\therefore$ जर $PQ = a$ तर $PR = 2a$ आणि $QR = \sqrt{3}\,a$

